# बातमी मसुदा

## शासकीय तंत्रनिकेतनातील रिक्त जागांसाठी अंतिम प्रवेश फेरी

दिनांक :-१४/१०/२०२१

प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी (पॉलीटेक्निक) अभ्यासक्रमाच्या सर्व प्रवेश फेरी नंतर विविध शाखांमध्ये काही जागा शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन धुळे या संस्थेत रिक्त आहेत.त्या भरण्यासाठी संस्था स्तरावर अतिरीक्त प्रवेश फेरी दिनांक १८/१०/२०२१ रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात येत आहे.ज्या विदयार्थ्यांनी नोंदणी केली असेल अथवा नसेल असे सर्व विदयार्थी या फेरीसाठी पात्र असतील.या फेरीसाठी रिक्त जागांवर नियमानुसार प्रवेश देण्यात येईल व निवड झालेल्या विदयार्थ्यांना तात्काळ त्याच दिवशी प्रवेश निश्चित करावा लागेल.तरी इच्छुक विदयार्थ्यांनी मुळ प्रमाणपत्रे व प्रवेश शुल्क सहीत सदरील दिवशी शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन धुळे या संस्थेत उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य डॉ.आर.जी.वाडेकर,यांनी केले आहे.

(डॉ.आर.जी.वाडेकर)

प्राचार्य,

लोकमत

# पॉलिटेक्निकसाठी उद्या अतिरक्त प्रवेशफेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रमाच्या सर्व प्रवेश फेरीनंतर विविध शाखांमध्ये काही जागा शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे येथे रिक्त आहेत. त्या भरण्यासाठी संस्था स्तरावर अतिरिक्त प्रवेश फेरी सोमवारी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असेल अथवा नसेल असे सर्व विद्यार्थी या फेरीसाठी पात्र असतील.